# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ६/०९/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४१४** — **विषय क्रमांक – ४१४**

**दिनांक- ६/०९/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४१४<br>दिनांक-६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/वि/कावि/०२/३४१/२०२३ दि.१८/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२११९ दि.२३/८/२०२३ अन्वये, रुपीनगर तळवडे येथील २२० केव्ही चिंचवड चाकण/टेल्को लाईन मनोरा क्र.३४ स्थलांतरीत करणेबाबत या कामाचा नव्याने अंदाजपत्रकात समावेश करुन प्रशासकीय मान्यतेबाबत. |
| **ठराव क्र. ४१४<br>दिनांक-६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/वि/कावि/०२/३४१/२०२३ दि.१८/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२११९ दि.२३/८/२०२३ अन्वये, महापारेषण कंपनीची रुपीनगर तळवडे येथील २२० केव्ही चिंचवड चाकण / टेल्को लाईन ची उच्चदाब उपस्कर वाहिनी मोरेवस्ती चिखली या भागातून वीज वहन करते. सदर वाहिनीच्या मनोरा क्र. ३४ च्या मध्य भागातून मनो-या खालून अत्यंत धोकादायक पद्धतीने वाहनांची ये-जा चालू असते ही वाहने मनोऱ्यास धडकून अपघात होऊन वीजपुरवठा खंडीत होण्याची शक्यता आहे तसेच भविष्यात वाहिनी पासून वाहनांचे सुरक्षित अंतर न राखले गेल्याने गंभीर अपघाताची तसेच जीवीत व वित्त हानी होण्याची शक्यता आहे. सदर रस्ता वाहतुकीस बंद करणेची मागणी म.रा.वि.पा.कं. तसेच माजी नगरसदस्य यांनी वेळोवेळी केलेली आहे. विषयांकित प्रकरणी दि.१५/१२/२०२० रोजी मा.आयुक्त व मा.मुख्य अभियंता महापारेषण यांचे उपस्थितीत झालेल्या बैठकीत सदर रस्ता बंद करणेच्या सूचना दिलेल्या होत्या. परंतु प्रत्यक्षात आजतागायत रस्ता वाहतुकीस बंद न झालेने महापारेषणकडून वारंवार पत्राद्वारे पाठपुरावा चालू आहे. मा अधिक्षक अभियंता महापारेषण यांनी रस्ता बंद करणे शक्य नसल्यास मनोरा क्र. ३४ चे स्थलांतर करणेबाबत सूचित केले आहे. तथापि सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन दि. २६/१२/२०२३ रोजी मा.आयुक्त, मा.अधिक्षक अभियंता, महापारेषण पुणे तसेच मा.सह शहर अभियंता, पिं. चिं. म. न. पा. यांचेसमवेत झालेल्या बैठकीत सदर मनोरा क्र. ३४ व त्या अनुषंगाने लगतचा मनोरा क्र. ३३ स्थलांतरीत करून मोनोपोल उभारणेच्या सूचना मा.आयुक्त यांनी दिलेल्या आहेत. उपरोक्त कामाचे तात्पुरते अंदाजपत्रक महापारेषण कं. कडून म.न.पा.स प्राप्त झालेले असून त्या अनुषंगाने मनपामार्फत सदर मनोरा स्थलांतरीत करणेच्या कामास अंदाजे र.रु.११ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे परंतु सदर कामाचा सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात समावेश नसल्याने व प्रस्तावित केलेनुसार मान्यता असल्यास सदर कामाचा मनपा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समावेश करणे क्रमप्राप्त आहे. त्याकरिता मा.महापालिका सभेच्या |

प्राप्त अधिकारांतर्गत खालीलप्रमाणे मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | लेखाशिर्ष नांव | अंदाजपत्रक पानांक व अ.क्र. | बजेट कोड | अंदाजपत्रकीय रक्कम | उपलब्ध तरतूद र.रु. | तरतूद वाढ र.रु | तरतूद घट र.रु | सुधारित तरतुद रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत रुपीनगर तळवडे येथील महापारेषण कंपनीचा २२० केव्ही मनोरा क्र. ३४ स्थलांतरीत करणे. | स्थापत्य प्रकल्प | नव्याने समावेश | नव्याने समावेश | १५०००००० | ० | १००० | ० | १००० |
| २ | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत चिखली मोरेवस्ती प्रभाग क्र.१ मधील नव्याने होणा-या अंतर्गत व इतर रस्त्यावर दिवाबत्तीची व्यवस्था करणे व अनुषंगिक कामे करणे. (२०२१-२०२२) | सार्वजनिक सुरक्षितता | ४२८-२० | २२२३० ५७७१ | ४०००००० | ८९६००० | ० | १००० | ८९५००० |
| | एकुण | | | | १५४०००००० | ८९६००० | १००० | १००० | ८९६००० |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४१५** — **विषय क्रमांक – ४१५**

**दिनांक- ६/०९/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

**विषय क्रमांक-४१५**
**दिनांक-६/०९/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पवै/०३/कावि/१२८/२०२३ दि.२३/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२१३५ दि.२३/८/२०२३ अन्वये, भटक्या जनावरांसाठी ऍनिमलशेल्टर (प्राणी सुश्रुषा केंद्र) कामकाज पिपल फॉर ऍनिमलस या संस्थेस देणेबाबत.

**ठराव क्र. ४१५**
**दिनांक-६/०९/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पवै/०३/कावि/१२८/२०२३ दि.२३/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२१३५ दि.२३/८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोठ्या संख्याने भटके श्वान व जनावरे यांचेबाबत वेगवेगळया कारणानी अनेक तक्रारी विभागास प्राप्त होत आहेत.जसे की इजा होणे, अपघात होऊन गंभीर जखमी होणे, अतिसार व उलटी व इतर गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या प्राण्यांबाबत तक्रारी प्राप्त झाल्यावर औषधोपचार तातडीने करण्याची गरज असते. सद्यस्थितीत अश्या भटक्या जनावरांवर दिर्घ काळ उपचार करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे नेहरुनगर येथे प्राणी सुश्रुषा केंद्र कार्यान्वित असून याबाबत कामकाज करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड परिसरातील नागरिकांमार्फत प्राप्त होण-या तकारी जसे की, अपघात ग्रस्त श्वान व मांजर, पिसाळलेले श्वान व विविध प्रकारच्या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या प्राण्यांबाबत तक्रारी येत आहेत. सद्यस्थितीत

विभागामार्फत श्वानांच्या उपचारासाठी आय.पी.डी. व ओ.पी.डी. कार्यान्वित आहे. मे.पीपल फॉर ॲनिमल (P.F.A) यांनी आजारी प्राण्यांचे काळजी व तक्रार व्यवस्थापन करणेकामी (आय.पी.डी कामकाज) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे ई-मेल व्दारे दि.२१/०८/२०२३ रोजीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुषंगाने सेवा उपलब्ध करुन देणे कामी अटी व शर्ती सादर केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे –

| अ क्र | पीपल्स फॉर ॲनिमल, पुणे यांचे कामकाज. | महानगरपालिकेने उपलब्ध करुन द्यावयाच्या सुविधा. |
|---|---|---|
| १ | जखमी व आजारी प्राण्यांबाबत संपुर्ण कामकाज (आय.पी.डी.व रुग्णालयीन सेवा) | आवश्यक पिंजरे व सोय सुविधा उपलब्ध करुन देणे. |
| २ | आवश्यक सर्व कर्मचारी पुरविणे - पशुवैद्यक, पशुधन पर्यवेक्षक, ॲनिमल केअर टेकर, डॉग कॅचर व सफाई कामगार, इ. | विद्युत व पाणी पुरवठा विषयक सुविधा पुरविणे. |
| ३ | मांजर संतती नियमन विषयक शस्त्रक्रिया | आवश्यकते नुसार सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणे व सेक्युरेटी थंम्ब सिस्टिम बसवणे. |
| ४ | आय.पी.डी उपचाराकरीता लागणारे औषधे | डॉग कॅचिंग व्हॅन, वाहन चालक व इंधनासह उपलब्ध करणे. |
| ५ | आय.पी.डी. मध्ये दाखल प्राण्यांना लागणारे खाद्य व पाणी पुरविणे. तसेच स्वच्छते विषयक संपुर्ण कामकाज. तसेच म.न.पा ने उपलब्ध करुन दिलेले लसी,औषधे यांचा हिशोब, अभिलेख ठेवणे | लस उपलब्ध करुन देणे.<br>1.NOBIVAC TRICAT TRIO vaccine - 60 quantity per month<br>2. 7in 1 DHPPI vaccine - 60quantity per month<br>3. anti-rabies vaccine (ARV) - 250 quantity per month |
| ६ | शेल्टरच्या अनुषंगाने येणा-या तक्रारी जखमी व आजारी प्राणी यांचे उपचाराबाबत संपुर्ण कामकाज. | जैविक कच-याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करणे. |
| ७ | जन-जागृती विषयक कामकाज (महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने कामकाज करणे) | शस्त्रक्रिया दालनामधील आवश्यक साहित्य पुरवणे. |
| ८ | आजारी व जखमी प्राण्यांना आवश्यकते नुसार उचलणे व प्राणी संपुर्ण बरा झालेनंतर मुळ ठिकाणी सोडणे. आजारी व जखमी प्राण्यांचा संपुर्ण नोंदी ठेवणे आवश्यक राहील. | प्राणी सुश्रुषा केंद्र व जखमी-आजारी प्राण्यांबद्दल प्राप्त तक्रारी बाबत संपुर्ण कामकाजकरीता, आवश्यक साहित्य, मनुष्यबळ पुरवठा करण्यासंदर्भात र.रु. ८०,०००/- प्रति माह अदा करणे. |
| ९ | श्वान व मांजर दत्तक कार्यक्रम विषयक कामकाज. | शेल्टर विषयक कामकाज व तक्रारी बाबत कार्यवाही करणे करीता एक समन्वयक उपलब्ध करुन देणे. |
| १० | शेल्टर विषयक कामकाज व विभागास प्राप्त तक्रारी बाबत कार्यवाही करणे करीता एक समन्वयक व हेल्पलाईन क्र उपलब्ध करुन देणे | संस्थेच्या कामकाजावर विभागाने नियंत्रण ठेवुन कामकाज करणे. |

उपरोक्त प्रमाणे नमुद मे.पिपल फॉर ॲनिमल्स (पि.एफ.ए) या संस्थेने देऊ केलेली सुविधा क्र. १ ते १० उपलब्ध करुन देण्यासाठी प्राणी सुश्रुषा केंद्र व जखमी-आजारी प्राण्यांबद्दल प्राप्त तक्रारी बाबत संपुर्ण कामकाज, आवश्यक साहित्य, मनुष्यबळ पुरवठा इ. कामकाजाचे मोबदल्यात एकुण र.रु.८०,०००/- प्रती माह महानगरपालिकेडुन मागणी केली आहे. सदरचे कामकाज विशेष प्रकारचे असल्याने नमुद रक्कमेचा खर्च, महापालिकेकडुन संस्थेने मागीतलेल्या सुविधा, लसी व कामकाजा वर पशुवैद्यकीय विभागाचे संपुर्ण नियंत्रण ठेवुन ३ वर्ष कामकाज करणेकामी प्रस्ताव सादर केले असता दि.२२/०८/२०२३ च्या प्रस्ताव अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामकाजास मान्यता घेणे आवश्यक आहे. मान्य झाल्यास मा.स्थायी समितीच्या मंजुरीने सदरचा खर्च पशुवैद्यकीय विभागाच्या प्राणी सुश्रुषा केंद्र साहित्य व प्राणी खाद्य खर्च या लेखाशिर्षकामधून खर्च करण्यात येईल. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पशुवैदयकीय विभागाकडील भटक्या प्राण्यासाठी ॲनिमल शेल्टर(प्राणी सुश्रुषा केंद्र) मे.पीपल फॉर ॲनिमल या संस्थेने तीन वर्ष कालावधीकरीता कामकाज करणे व सदर संस्थेने देऊ केलेली सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या क्षेत्रात लागणारे अनुभवी मुनष्य बळ पुरवणे व त्या माध्यमातून सल्लागार व व्यवस्थापन, औषधेउपचार प्राप्त तक्रारींचे निवारण पुर्ण क्षमतेने करणेकरीता येणा-या खर्चास र.रु.८०,०००/- प्रतिमाह व मागितलेली सुविधा तसेच मागणी केल्याप्रमाणे लस महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देणे व

| | |
|---|---|
| | करारनामा करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४१६** **विषय क्रमांक – ४१६**

**दिनांक- ६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४१६<br>दिनांक-६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्था/कावि/०५/८४/२०२३ दि.२५/०८/२०२३ अन्वये, प्रभाग क्र १५ मधील आकुर्डी डिस्ट्रीक्ट सेंटर येथे अँम्पिथिएटर बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेबाबत.या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेबाबत. |
| **ठराव क्र. ४१६<br>दिनांक-६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्था/कावि/०५/८४/२०२३ दि.२५/०८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्राधिकरण आकुर्डी डिस्ट्रीक्ट सेंटर येथे अँम्पीथिएटर इमारत बांधणेचे नियोजन बाबत मा. आयुक्त सो यांचेकडील दिनांक ३/८/२०२३ रोजी सादरीकरण करून सदर जागेवर अँम्पिथिएटर बांधणे कामाचे आराखडा व अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करणेकामी मे. सोलस्पेस आर्किटेक्ट चे शशांक फडके यांना सुचना देणेत आली आहे. तथापी सदर काम करणेकरीता कामाचा मनपा अंदाजपत्रकात समावेश करून अंदाजे र.रू. ३०,००,००,०००/- प्रशासकीय मान्यता अपेक्षीत आहे व सदर कामाकरीता या आर्थिक वर्षात मार्च २०२४ अखेर र.रू. २५,००,०००/- इतकी तरतुद आवश्यक आहे. सदर खर्चाचा व पुढील खर्चाचा समावेश सुधारीत अंदाजपत्रकात करणे शक्य आहे. तथापि सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात या कामाचा समावेश नाही त्यामुळे सदर कामाचा समावेश अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात खाली तक्त्यात नमुद केलेल्या कामाचा समावेश करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ क्र | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | पान क्र/ अ क्र | सन २०२३-२४ ची तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र १५ मधील आकुर्डी डिस्ट्रीक्ट सेंटर येथे अँम्पिथिएटर बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे | ३००००००० | विशेष योजना | --- | ० |

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४१७** **विषय क्रमांक – ४१७**

**दिनांक- ६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४१७**<br>**दिनांक-६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. बक्षे/स्था/कावि/०६/९८९/२०२३ दि.४/९/२०२३ अन्वये, मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. बक्षे/स्था/कावि/०६/९८९/२०२३ दि.४/९/२०२३ अन्वये, क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे करीता सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ४१७**<br>**दिनांक-६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. बक्षे/स्था/कावि/०६/९८९/२०२३ दि.४/९/२०२३ अन्वये, क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याचे कामाबाबत मा. आयुक्त सो. व मा. खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांच्या समवेत दि.०९/०३/२०२३ रोजी मा.आयुक्त कक्षात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस क्रां.चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी व मनपा अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या तिस-या टप्प्याची उर्वरित कामे (बहुउद्देशिय सभागृह, प्रदर्शना करीता हॉल, ऐतिहासीक वस्तुंचे संग्रहालया करीता हॉल, कॉन्फरन्स हॉल, जिमनॅशियम हॉल इत्यादी) करणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार आवश्यक सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रू. ३० कोटी रक्कमेस मा.महापालिका सर्वसाधारण सभेमध्ये सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रू. ३० कोटी रक्कमेस मा.महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.२९२,दि.२१/०३/२०२३ च्या नुसार मान्यता मिळालेली आहे. तथापि तदनंतर क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीने बदल सूचविल्यानुसार समितीमार्फत करावयच्या क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे भाग-४ चे कामाच्या रक्कमेमध्ये वाढ झालेली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांनी सादर केलेले आहे.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र १८ मधील चिंचवडगाव येथे क्रांतिवीर चापेकर बंधुंचा जुना वाडा ही पुरातन ऐतिहासीक वास्तु होती. सदर वाडा हा मोडकळीस आल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामधील चिंचवड येथील क्रांतिवीर चापेकर बंधूचे स्मारक उभारणेकरीता मा. दत्ताजी साळवी, सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना विनंती करून असे स्मारक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उभारावे असे सुचविले. मा. मुख्यमंत्री महोदयांनी त्यांची विनंती मान्य केली. त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिवांनी त्यांचे पत्र क्र. मुमंस/ फाईल/ कक्ष/ १५/ ५७८ दि.१२/०६/१९९७ अन्वये सदरचे क्रांतिवीर चापेकर बंधूचे स्मारक उभारणे बाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विचार करून यथोचित स्मारक उभारणेचा विचार करावा असे निर्देश दिले होते.<br><br>सदर कामाबाबत मा. आयुक्त सो. व मा. खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांच्या समवेत दि.०९/०३/२०२३ रोजी मा.आयुक्त कक्षात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस क्रां.चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी व मनपा अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या तिस-या टप्प्याची उर्वरित कामे (बहुउद्देशिय सभागृह, प्रदर्शना करीता हॉल, ऐतिहासीक वस्तुंचे संग्रहालया करीता हॉल, कॉन्फरन्स हॉल, जिमनॅशियम हॉल इत्यादी) करणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. |

त्यानुसार आवश्यक सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रू. ३० कोटी रक्कमेस मा.महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.२९२,दि.२१/०३/२०२३ च्या नुसार मान्यता मिळालेली आहे. तथापि तदनंतर क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीने बदल सूचविल्यानुसार समितीमार्फत करावयाच्या क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे भाग-४ अंतर्गत (अ) स्मारकांचे इमारतीमध्ये ऐतिहासिक काळातील लाकडीकाम, दगडीकाम व अंतर्गत सुशोभिकरणाची कामे करणे व कामाचे काहीबाबी मध्ये क्रां.चापेकर समिती मार्फत आवश्यकतेनुसार काही अंशी बदल व वाढ सुचवण्यात आले आहे. त्यामुळे सदर कामी यापुर्वी घेतलेल्या दि.२१/०३/२०२३ प्रशासकीय मान्यता र.रू.७,६०,००,०००/- मध्ये ही र.रू.१.४३ कोटी इतकी वाढ होऊ (अ) साठी एकुण र.रू.९,०३,००,०००/- सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

तसेच भाग (४) अंतर्गत नव्याने करावयाचे (ब) ऐतिहासिक कास्यं शिल्प, किल्याचे फायबर ग्लास मॉडल, कॅनवॉस पेंटीग, जिंवत मानवी आकारसदृश्य फायबर ग्लास पुतळे, ऐतिहासिक क्रांतिकारकांची माहिती, इ.कामाचा समावेश आहे. सदर कामाचे र.रू.२३,०६,६९,५००/- चे तपसीलवार अंदाजपत्रक व आराखडे संबधित कामाचे सल्लागार किमया आर्किटेक्ट यांनी मंजुरीकामी सादर केलेले आहेत. सदरचे काम क्रांतिवीर चापेकर समितीमार्फत टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असुन कामाची अमंलबजावणी कामी र.रू.२३,०६,६९,५००/- प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे करण्याचे भाग (४) अंतर्गत क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती मार्फत (अ) व (ब) च्या कामास नव्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे येत आहे.

| अ.क्र. | कामाचा नाव | सुधारित प्रशासकीय मान्यता र. रु. | कामाचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | क्रां.चापेकर वाड्याच्या तिस-या टप्पाची कामे करणे (भाग-२) | १२,५८,००,०००/- | मंजुर बांधकाम नकाशानुसार इमारतीचे आर.सी.सी बांधकाम प्लास्टर व इतर अनुषंगिक कामे करणे. | अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. |
| २. | क्रां.चापेकर वाड्याच्या तिस-या टप्पाची कामे करणे (भाग-३) | ७,२६,००,०००/- | स्मारकांचे तयार होणा-या इमारतीमध्ये अंतर्गत सजावट करणेसाठी म्युरल्स, ऐतिहासिक काळातील भांडी,लाकडी कपाटे,धातूशिल्प इ.कामे करणे | क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीमार्फत काम चालू आहे. |
| ३. | क्रां.चापेकर वाड्याच्या तिस-या टप्पाची कामे करणे (भाग-३) | २,५६,००,०००/- | स्मारकांचे तयार होणा-या इमारतीमध्ये विविध क्रांतिकारकांचे एकूण ४७ पुतळे तयार करणे. | क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीमार्फत काम चालू आहे. |
| ४. | क्रां.चापेकर वाड्याच्या तिस-या टप्पाची कामे करणे (भाग-४) | अ) ९,०३,००,०००/- | स्मारकांचे इमारतीमध्ये ऐतिहासिक काळातील लाकडीकाम, दगडीकाम व अंतर्गत सुशोभिकरणाची कामे करणे. | क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती मार्फत निविदा कार्यवाही करून सदरचे काम करण्यात येणार आहे. |
| | | ब) २३,०६,६९,५००/- | ऐतिहासिक कास्यं शिल्प,किल्याचे फायबर ग्लास | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मॉडल, क्रांतिकारांविषयी माहिती,फायबार ग्लासचे पुतळे इ.कामे करणे. | |
| | एकूण (अ +ब) | ३२,०९,७७,४२४/- | | |
| | १+२+३+४ | ५४,४९,७७,४२४/- | | |
| | एकूण | ५४,५०,००,०००/- | | |

उपरोक्त प्रमाणे क्रां.चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्यातील कामाकरीता एकूण रक्कम र.रू ५४.५० कोटी रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४१८** **विषय क्रमांक – ४१८**

**दिनांक- ६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४१८**<br>**दिनांक-६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. औप्रसं/०३/कावि/२२४/२०२३ दिनांक - ४/०९/२०२३ अन्वये आय.टी.आय उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना परदेशातील उच्च शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध होणेकामी सहाय्य करणे बाबत. |
| **ठराव क्र. ४१८**<br>**दिनांक-६/०९/२०२३** | मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. औप्रसं/०३/कावि/२२४/२०२३ दिनांक - ४/०९/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आय.टी.आय विभागामार्फत महापालिका हद्दीतील वास्तव्य असलेल्या शासकीय किंवा शासन मान्यतापात्र (DGT नवी दिल्ली मान्यता प्राप्त) आय.टी.आय (ITI) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना परदेशात उच्च शिक्षण व रोजगारच्या संधी निर्माण करून देणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांच्या निर्देशानुसार सहाय्यभुत योजना प्रस्तावित करणेत येत आहेत. शासकीय किंवा शासन मान्यतापात्र (DGT नवी दिल्ली मान्यता प्राप्त) आय.टी.आय मधील अभ्यासक्रमपूर्ण केलेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना परदेशातील उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होणेकामी सहाय्य करणेकामी म.न.पा.चे आय.टी.आय. मार्फत नियुक्त केलेल्या तज्ञ संस्थेच्या मदतीने महापालिकेच्या सद्य:स्थितीत सुरू असलेल्या व नव्याने प्रस्तावित योजनांच्या माध्यमातून “पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असलेल्या आणि शासकीय किंवा शासन मान्यतापात्र (DGT नवी दिल्ली मान्यता प्राप्त) आय.टी.आय अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना परदेशी उच्च शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध होणेकामी मार्गदर्शन व सहाय्य करणे” अशा स्वरूपाची योजना प्रपत्र ‘अ’ नुसार अटी व शर्ती निश्चित करून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून मनपा आय.टी.आय विभागामार्फत राबविण्यास तसेच समाज विकास विभागाकडील प्रचलित योजना, उदा. महिला व बाल कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना इत्यादी मधील परदेशी उच्च शिक्षणासाठीचे अर्थसहाय्य या योजने अंतर्गत आर्थिक लाभ संबंधित घटकातील शासकीय |

| | |
|---|---|
| | किंवा शासन मान्यतापात्र (DGT नवी दिल्ली मान्यता प्राप्त) आय.टी.आय. उत्तीर्ण विद्यार्थी / विद्यार्थीनींना लागू करुन योजनेच्या प्रस्तावातील अटी-शर्तीनुसार व प्रपत्र अ प्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर देणेकामी धोरण निश्चित करण्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४१९** **विषय क्रमांक – ४१९**

**दिनांक- ६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-४१९<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/१०/१७२/२०२३ दि.०५/०९/२०२३ अन्वये सुधारीत विकास योजना- पिंपरी-चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(३) अन्वये प्रारूप विकास योजना कामास सह संचालक, नगररचना, पुणे विभाग यांचेकडून मुदतवाढ घेणेबाबत. |
| ठराव क्र. ४१९<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/१०/१७२/२०२३ दि.०५/०९/२०२३ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राची, सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ व ३८ अन्वये अनुक्रमे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने ठराव क्र. ४५३. दि. ०७/०९/२०१९ अन्वये इरादा व उक्त प्राधिकरणाने ठराव क्र. ३४०, दि. ०९/०८/२०१९ अन्वये इरादा पारित केला आहे. सदर क्षेत्राकरीताचा इरादा दि. २०/११/२०१९ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेला आहे. उक्त अधिनियमाचे कलम २४ अन्वये महानगरपालिकेने दि. ०२/०१/२०२० चे आदेश क्र. नरवि/कावी/१०/०१/२०२० अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. उक्त प्रारूप विकास योजना ही GIS Based प्रणालीवर बनविली जात आहे. जमिनीचे सर्वेक्षण करणे व त्या क्षेत्राचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्यासाठी, HCP Design Planning & Management Pvt. Ltd., Ahmedabad या खाजगी सल्लागार कंपनीची नेमणूक महानगरपालिकेने दि.०८/०३/२०१८ च्या कार्यादेशान्वये केलेली आहे.<br><br>त्यानंतर पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे शासनाचे नगर विकास विभागाचे दि.०७/०६/२०२१ चे अधिसूचनाद्वारे काही क्षेत्र महानगरपालिकेमध्ये विलीन करण्यात आले आहे. महानगरपालिकेमध्ये विलीन झालेल्या क्षेत्रासाठी महानगरपालिकेची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ४०(१) अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच उपसंचालक नगररचना विशेष घटक विकास योजना यांनी दि.२५/०८/२०२१ रोजीच्या पत्र क्र.तांत्रिक/उसनरवियोविघ/१३८ अन्वये कळविलेनुसार सदर क्षेत्रासाठी विशेष नियोजन महानगरपालिकेने ठराव क्र. ७१८, दि. २०/१०/२०२१ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम २३ व ३८ इरादा जाहिर करणेचा ठराव पारित केला आहे. त्याअनुषंगाने "नगर रचना |

| | |
|---|---|
| | अधिकारी” यांनी उक्त कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा दि. २३/०३/२०२२ चे पत्र क्र. तांत्रिक/उसनरवियोविघ/१६१ अन्वये महानगरपालिकेकडे हस्तांतरित केला आहे. सद्यस्थितीत प्रस्तावित जमिन वापर नकाशा बनविण्याचे काम चालू आहे. दरम्यान उपसंचालक,नगररचना यांनी दि.०८/०२/२०२२ चे पत्र क्र. तांत्रिक/उसनरवियोविघ/ बेसमॅप/भु.अभिलेख/५१ अन्वये कळविलेनुसार पायाभूत नकाशा भूमिअभिलेख विभागाकडून तपासून घेणेचे कळविलेनुसार HCP Design Planning & Management Pvt. Ltd., Ahmedabad यांना कामाचे कार्यारंभ आदेश देणेत आले आहेत.सदरचे काम प्रगतीपथावर आहे.<br><br>उर्वरित कामाकरिता कंपनीचे संबंधीत प्रतिनिधी विकास योजना विशेष घटक कार्यालयात सलग हजर राहिल्यास, सदर काम पूर्ण करणेसाठी सल्लागार कंपनीला अंदाजे अजून किमान २ महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे असे विकास योजना विशेष घटक कार्यालयाने कळविले आहे. Base Map Verification चे काम उप अधिक्षक, भूमी अभिलेख मुळशी, हवेली व पिंपरी यांचेमार्फत सुरू आहे.सदर कामाची मुदत संपली आहे व यापुढे आणखिही लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. Base Map Verificationनंतर भूमी अभिलेख विभागास दुरूस्त्या करणे शहर नियोजनप्रमाणे अंतिम करणे यास विलंब होणार आहे. ही कामे पुर्ण झाल्यानंतर विकास योजना विशेष घटक कार्यालयाकडून प्राप्त विकास आराखडा तयार करणेत येऊन अंतिम प्रारूप विकास आराखडा मनपाकडे प्रसिध्दीसाठी सादर होईल. त्यानंतर मनपाच्या सर्वसाधारण सभेपुढे प्रसिध्दीसाठी सादर करावा लागणार आहे.या सर्व प्रक्रियेस कमीत कमी ६ महिनेचा कालावधी लागणार आहे.त्यामुळे विकास योजना प्रसिध्द करणेस दि.१०/०९/२०२३ ते दि.०९/०३/२०२४ पर्यतची पहिली सहा महिन्याची मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. यासाठी मा.महानगरपालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. त्याअनुषंगाने प्रकरणी मुदत संपत आली असलेने मा.संचालक, नगररचना,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे ६ महिन्यांचा मुदतवाढीचा (दि.०९/०३/२०२४ पर्यंत) प्रस्ताव पाठविणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४२०** **विषय क्रमांक – ४२०**

**दिनांक- ६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-४२०<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.इ/स्था/कावि/०१/५१३/२०२३ दि.५/९/२०२३ अन्वये स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालयाकडील अंदाजपत्रकातील कामामध्ये सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| ठराव क्र. ४२०<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.इ/स्था/कावि/०१/५१३/२०२३ दि.५/९/२०२३ अन्वये इ क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभागातील विविध नविन कामे काढण्याच्या संदर्भात मा.आमदार, भोसरी विधानसभा मतदारसंघ यांनी दि.२९/०७/२०२३ चे पत्रान्वये मागणी केलेली आहे. सदर मागणी पत्रामध्ये च-होली येथील बैलगाडा घाट व आखाड्याचे |

सुशोभिकरण करणेचा समावेश आहे. सदर कामाची वस्तुस्थिती पुढील प्रमाणे आहे. "प्रभाग क्र.३ च-होली येथील वाघेश्वर मंदिराचे बाजूचा परीसर सुशोभिकरण करणे." या कामामध्ये मौजे च-होली येथे बैलगाडा घाट तसेच कुस्तीचा आखाडा गेली अनेक वर्षापासून चालू आहे. सदरचा बैलगाडा घाट व आखाडा फार जुना असलेने मोडकळीस आलेला आहे व सदर ठिकाणी नागरीकांना बसण्याचीही व्यवस्था नाही. सदर ठिकाणी टेकडीचा भाग असून श्री वाघेश्वर महाराजांचे मंदिर आहे व उद्यान विभागामार्फत सदर ठिकाणी उद्यान विकसित केलेले आहे. सदर ठिकाणी नव्याने बैलगाडा घाट / आखाडा तसेच सुशोभिकरण करणेकरीता तेथील नागरीक व माजी नगरसदस्य यांनी मागणी केलेली आहे. सदरचा बैलगाडा घाट / आखाडा ग्रामपंचायतच्या काळापासून तेथील नागरीक वापर करीत आहे. सदरची जागा चिंचवड देवस्थानची आहे. प्रस्तुत कामाचे यापुर्वी नियोजन करताना केवळ बैलगाडा घाटाच्या कामाचा समावेश होता. तथापि मा.आमदार भोसरी विधानसभा मतदारसंघ यांचे दि.२९/०७/२०२३ चे पत्राच्या अनुषंगाने बैलगाडा घाट, कुस्ती आराखड्याच्या परीसरात बैठकाची व्यवस्था व सुशोभिकरण इत्यादी बाबींचा समावेश केलेला आहे. त्यामुळे कामाची अंदाजपत्रकीय रक्कम वाढलेली आहे. सदर ठिकाणी बैलगाडा घाट व आखाडा तसेच घाटावरील सुशोभिकरण करणेकरीता अंदाजे र.रु. १२.०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामास सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकात र.रु. ५.०० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता आहे. उपरोक्त मागणीचा विचार करता या कामास प्रशासकीय मान्यता १२.०० कोटी इतकी वाढविणेची आवश्यकता असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ.क्रं. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | प्रभाग | बजेट कोड | पानांक | अ.क्रं. | लेखा शिर्ष | मुळ प्रशासकीय र.रु. | सुधारित प्रशासकीय र.रु. | सन २०२३-२०२४ चा मुळ अंदाजपत्रकातील तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३ च-होली येथील वाघेश्वर मंदिराचे बाजूचा परीसर सुशोभिकरण करणे. | ३ | २३२४०० ४६५ | ६९ | ८९ | विशेष योजना | ५०००००० | १२०००००० | १००० |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४२१** **विषय क्रमांक – ४२१**

**दिनांक- ६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-४२१<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अ/स्था /कावि/०८/८७/२०२३ दि.५/९/२०२३ अन्वये मनपाचे प्रभाग क्र.१० मधील आवश्यक असलेली कामे करणेसाठी तरतूद वर्गीकरण करणेबाबत. |
| ठराव क्र. ४२१<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अ/स्था /कावि/०८/८७/२०२३ दि.५/९/२०२३ अन्वये प्रभाग क्र.१० मध्ये संभाजीनगर व शाहूनगर या मोठ्या निवासी भागाचा समावेश झालेला आहे. या भागातील बहुतांश रस्ते डांबरीकरण, फुटपाथ व सुशोभिकरण इ. सुमारे ८ ते ९ वर्षापूर्वी मॉडेल वॉर्ड अंतर्गत करणेत आलेले आहे. दरम्यानचे काळात डागडूजी वगळता मोठ्या प्रमाणावर रस्त्यांची / दुरुस्तीची व डांबरीकरणाची कामे झालेली नाहीत. तथापि ठिकठिकाणी रस्ते खोदाई काम झालेली आहे. MNGL / Smart City / पाणीपुरवठा / ड्रेनेजलाईन / नळ कनेक्शन / वीज कनेक्शन इ. निविदा कारणांमुळे रस्त्यांची डांबरीकरण कामे करणे व पदपथ दुरुस्ती करणेची आवश्यकता आहे. याबाबतचे ठिकठीकाणचे फोटो सोबत जोडलेले आहे. तसेच संभाजीनगर परिसरातील मुख्य रस्त्यांचे कॉंक्रीटिकरण करणे यापूर्वी प्रस्तावित होणे याकामी सल्लागार नेमणूकही करणेत आलेली आहे. सदर कामासाठीही तरतूद वर्गीकरणाची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे MIDC “G” Block मधील GP-१३२ या प्लॉटवरील नियोजित प्रकल्पास MIDC कडून यापूर्वीच बांधकाम परवानगी घेणेत आलेली आहे. सदरचा प्लॉट कोविड कार्याकाळात अपुऱ्या तरतुदीमुळे विकसित करणेकामी निविदा कार्यवाही करणेत आलेली नाही. आता सदर प्रकल्प दोन टप्प्यामध्ये करणेचे नियोजन असून पहिल्या टप्प्याची निविदा प्रसिद्ध करणेकामी तरतूद वर्गीकरण करून कार्यवाही करता येईल, यासाठी प्रभाग क्र.१० मधीलच मनपाचे नविन प्रशासकीय इमारतीचे र.रु.२५ कोटीचे तरतुदीमधून र.रु.६ कोटीचे वर्गीकरण करता येईल. खालील वर्गीकरण तक्ता प्रमाणे कामासाठी उर्वरित तरतुदी सुधारीत अंदाजपत्रकात करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ.क्र. | कामाचे नाव | पा. क्र. | अ. क्र. | लेखा शिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२३ २०२४ चा मूळ अंदाज | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १० मधील शाहूनगर परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. 222300316 | ४७ | ३३ | विशेष योजना | २५००००००० | १,००० | ९५,००,००० | - |
| २ | प्रभाग क्र. १० मधील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. 222300424 | ५० | ११३ | विशेष योजना | २५००००००० | १,००० | ९५,००,००० | - |
| ३ | प्रभाग क्र. १० संभाजीनगर मध्ये डांबरी करणाची कामे करणे. (सन २०२३ -२४) | २६८ | ०९ | महसुली | ७०००००० | १,००० | ४५,००,००० | - |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 232402029 | | | | | | | |
| | ४ | प्रभाग क्र.१० शाहूनगर मध्ये डांबरीकरणाची कामे करणे.(सन २०२३-२४) 232402046 | २६९ | २६ | महसुली | ७०००००० | १,००० | ४५,००,००० | - |
| | ५ | प्रभाग क्र.९ (नविन प्रभाग क्र. १०) संभाजीनगर येथील आरक्षण क्र.जी.पी. १३२ (बस टर्मिनस) विकसित करणे. 222301324 | ३० | २३ | विशेष योजना | १२००००००० | १,००० | ९५,००,००० | - |
| | ६ | प्रभाग क्र.१० विद्यानगर मध्ये मुख्य व अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाची कामे करणे. (सन २०२३-२४) 232402028 | २६८ | ८ | महसुली | ७०००००० | १,००० | ४५,००,००० | - |
| | ७ | प्रभाग क्र.१० मध्ये संभाजीनगर व इतर परिसरात पावसाळी गटर्स , स्टॉर्म वॉटर व फुटपाथ विषयक कामे करणे. (सन २०२३-२४) 232400809 | १०१ | १३ | भांडवली | ८०००००० | १,००० | ४५,००,००० | - |
| | ८ | प्रभाग क्र.१० मध्ये शाहूनगर व इतर परिसरात पावसाळी गटर्स , स्टॉर्म वॉटर व फुटपाथ विषयक कामे करणे. (सन २०२३-२४) 232400819 | १०१ | २३ | भांडवली | ८०००००० | १,००० | ५०,००,००० | - |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | प्रभाग क्र.१५ मध्ये आकुर्डी येथील नाट्यगृहाची उर्वरीत कामे करणे (अंतर्गत सजावट व बाहेरील सुशोभिकरणाची कामे करणे) 222301359 | ३९ | १ | विशेष योजना | ३५००००००० | ० | ३५,००,००० | - |
| १० | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड आरक्षण क्र.१८१ ड (पै) या भूखंडावर नविन प्रशासकीय इमारत बांधणे व आवश्यक अनुषंगिक कामे करणे 222313374 | ३० | ३८ | विशेष योजना | ५५००००००० | २५००००००० | - | ६०००००० |
| | | | | एकूण | | | ६,००,००,००० | ६,००,००,००० |

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४२२** **विषय क्रमांक – ४२२**

**दिनांक- ६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-४२२<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/स्था/कावि/०१/५१४/२०२३ दि.५/९/२०२३ अन्वये मनपाचे प्रभाग क्र. ७ भोसरी येथील संत ज्ञानेश्वर भाजी मार्केटचे सुशोभिकरण करणेबाबत. |
| ठराव क्र. ४२२<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/स्था/कावि/०१/५१४/२०२३ दि.५/९/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामधील प्रभाग क्र..७ भोसरी गावठाण मध्ये संत ज्ञानेश्वर भाजी मंडई इमारतीचा समावेश होतो . सदरची इमारत तळमजला + दोन मजले असून त्यामध्ये तळमजल्यामध्ये एकूण १८८ गाळे व एकूण ९५ दुकाने आहेत. सदरची इमारत भोसरी मध्ये मध्यवर्ती ठिकाणी असून लांडेवाडी ते पी सी एम टी चौक रस्त्यावर आहे. सदर भाजीमंडई इमारतीमध्ये मोठया प्रमाणावर खरेदीसाठी नागरीकांची रहदारी सतत चालू असते. सदर इमारतीचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. त्यास अनूसरून सदर इमारतीचे सुशोभिकरण करणे कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून सदर कामामध्ये आतून-बाहेरून रंगकाम, ए.सी.पी शीट, स्ट्रक्चर स्टीला इत्यादी कामांचा समावेश आहे. सदर कामाचा २०२३-२४ चे अंदाजपत्रकात समावेश नाही.<br><br>तथापी सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकामध्ये या कामाचा समावेश नाही त्यामुळे सदर |

<table>
<tr><td></td><td>कामाचा समावेश अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात खाली तक्त्यात नमुद केलेल्या कामाचा समावेश करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.<br><br>
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव</th><th>कामाची अंदाजपत्रकीय रक्कम</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रभाग क्र. ७ भोसरी येथील संत ज्ञानेश्वर भाजी मार्केटचे सुशोभिकरण करणे.</td><td>१,००,००,०००</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४२३** **विषय क्रमांक – ४२३**

**दिनांक- ६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

<table>
<tr><td>विषय क्रमांक-४२३<br>दिनांक-६/०९/२०२३</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र., अक्षेका/स्था/कावि/५/९७/२०२३ दि.६/९/२०२३ अन्वये मनपाचे प्रभाग क्र १५ मधील कै. पांडूरंग काळभोर सभागृह इमारत व व्यापारी गाळेची दुरूस्ती व नुतनीकरण करणे या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेबाबत.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ४२३<br>दिनांक-६/०९/२०२३</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र., अक्षेका/स्था/कावि/५/९७/२०२३ दि.६/९/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र १५ मधील कै. पांडूरंग काळभोर सभागृह व व्यापारी गाळे इमारत असून सदर इमारत अंदाजे २५ वर्षापुर्वी बांधणेत आलेली असून सद्यस्थितीत सदर इमारतीची दुरावस्था झाली आहे. सदर इमारतीमध्ये करसंकलन कार्यालय, पोलीस स्टेशन, जिम व वृद्धाश्रम असून सदर इमारतीची छतगळती झालेली आहे. स्वच्छतागृहाची तुटफुट झालेली आहे., फरशा तुटलेल्या आहेत, प्लास्टरला तडे गेलेले आहेत. खिडक्या, दरवाजे तुटलेल्या अवस्थेत आहेत. रंगरंगोटी करणे आवश्यक आहे. सदर सभागृहाची दुरूस्ती व नुतनीकरण करून मिळणेबाबत करसंकलन कार्यालयामधील कर्मचारी व परिसरातील नागरीकांच्या तक्रारी या विभागास प्राप्त होत आहेत. तसेच समाजविकास विभागाकडून येथील दुरूस्तीबाबत सुचना मिळाल्या आहेत. तसेच सदर दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करणे बाबत मा.अति.आयुक्त(१) यांनी सुचना दिल्या आहेत. तथापी सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकामध्ये या कामाचा समावेश नाही. त्यामुळे सदर कामाचा समावेश अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात खाली तक्त्यात नमुद केलेल्या कामाचा समावेश करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.<br><br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव</th><th>कामाची अंदाजपत्रकीय रक्कम</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रभाग क्र १५ मधील कै. पांडूरंग काळभोर सभागृह व व्यापारी गाळे इमारतीची दुरूस्ती व नुतनीकरण करणे.</td><td>१,००,००,०००</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४२४** **विषय क्रमांक – ४२४**

**दिनांक- ६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-४२४<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. वैद्य/१४अ/कावि/६७१/२०२३ दि.६/९/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील कार्यरत शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षकांना धन्वंतरी स्वास्थ योजना- २०१३ लागू करणे बाबत. |
| ठराव क्र. ४२४<br>दिनांक-६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. वैद्य/१४अ/कावि/६७१/२०२३ दि.६/९/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना धन्वंतरी स्वास्थ योजना -२०१३ लागू आहे. प्राथमिक शिक्षण विभागाकडील कार्यरत शिक्षक/सेवानिवृत्त शिक्षकांना धन्वंतरी स्वास्थ्य योजना-२०१३ लागू करणेकामी दि.०४/०९/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये महापालिकेच्या इतर कर्मचारी/अधिकारी यांचे प्रमाणेच प्राथमिक शिक्षण विभागाकडील कार्यरत शिक्षक/सेवानिवृत्त शिक्षकांना (कार्यरत शिक्षकास र.रु.३००/- व सेवानिवृत्त शिक्षकांस र.रु.१५०/-) मासिक सभासद वर्गणीची कपात त्यांचे वेतन/पेन्शन मधून करण्यास व या हिश्श्याच्या दुप्पट रक्कम मनपातर्फे या निधित जमा करणे आवश्यक आहे. सदरचा निधी जमा करुन २०१३ च्या धन्वंतरी स्वास्थ योजनेच्या धोरणामध्ये प्राथमिक शिक्षण विभागाकडील कार्यरत शिक्षक/सेवानिवृत्त शिक्षक यांचा अर्तभाव नसून त्यांचा त्यामध्ये अंर्तभाव करुन धन्वंतरी स्वास्थ योजना २०१३ च्या धोरणामध्ये बदल करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**